# उल्हासनगर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग
(कार्यालय दूरध्वनी क्रमांक ०२५१-२७२०११६
विस्तारित क्र. २०८/२४१)

## -: जाहिरात :-

**विषय**:- कोरोना (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्त्वावर कंत्राटी पद्धतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करण्याबाबत.

## थेट मुलाखत (DAILY WALK IN INTERVIEW)

कोरोना (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी पात्र इच्छुक उमेदवारांची कंत्राटी तत्त्वावर दिनांक ०७.०६.२०२१ या कालावधीमध्ये सकाळी ११.०० ते ३.०० वा. या कालावधीत स्थळ: अग्निशमन कार्यालय, महानगरपालिका मुख्यालयाच्या पाठीमागे, उल्हासनगर-३ येथे खालील नमूद पदांसाठी थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW) आयोजित करण्यात आलेली आहे. थेट मुलाखतीद्वारे नमूद पदांसाठी प्राप्त अर्जांपैकी उमेदवारांची तात्पुरती प्रारूप गुणवत्ता यादी तयार करून खालील पदे आवश्यकतेनुसार नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रारूप यादीमधून कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | फिजिशिअन (Physician) | एम. बी. बी. एस. (एम. डी.) | ०४ | २,५०,०००/- |
| २ | भूलतज्ज्ञ (Anasthesiologists) | एम. बी. बी. एस. (एम. डी.) यांना प्राधान्य किंवा एम. बी. बी. एस. (डी. ए.) | ०४ | २,५०,०००/- (एम. डी.) २,००,०००/- (डी.ए.) |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. बी. बी. एस. पदवी<br>२. शासकीय/ निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील खासगी रुग्णालयाकडील संबंधित कामाकाजाचा ०३ वर्षांच्या अनुभवास प्राधान्य. | १० | १,००,०००/- एम. बी. बी. एस. |
| | | ३. एम. बी. बी. एस. पदवी उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी. ए. एम. एस.<br>४. शासकीय/ निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील खासगी रुग्णालयाकडील संबंधित कामकाजाचा ०३ वर्षांच्या अनुभवास प्राधान्य | | ७५,०००/- |

उमेदवाराने खालील दिनांकास अग्निशमन कार्यालय, महानगरपालिका मुख्यालयाच्या पाठीमागे, उल्हासनगर-३ येथे मुलाखतीस उपस्थित राहावे. (WALK IN INTERVIEW)

| अ. क्र. | पदनाम | मुलाखतीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | फिजिशिअन (Physician) | दि. ०७.०६.२०२१ | सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारणे व दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुलाखत |
| २ | भूलतज्ज्ञ (Anasthesiologists) | | |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | | |

## -: अटी व शर्ती :-

१) सदर जाहिरात ही प्रारूप गुणवत्ता यादी तयार करून आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे प्रारूप गुणवत्ता यादीमधून कंत्राटी पद्धतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

२) उपरोक्त पदांकरिता कालावधी ०६ महिने किंवा कोरोना (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत.

३) क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिकदृष्ट्या काम करण्यास सक्षम असावा.

४) सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरूप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दूरध्वनीवर करण्यात येऊ नये.

५) वयोमर्यादा: खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ४० वर्षांपेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल असेल. प्रतिसाद कमी असलेल्या पदांसाठी सदर अटी शिथिल करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.

६) वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक राहील.

७) नियुक्त उमेदवारांना कोव्हिड-१९ रुग्णाची सेवा करणे अनिवार्य राहील.

८) सदरचे पद संपूर्णपणे कंत्राटी स्वरूपाचे आहे.

९) सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका (Objective assessment) पद्धतीने वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे करण्यात येतील.

१०) उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह चार पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात असेल तर त्या पात्र उमेदवारांच्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार गुणवत्ता विचारात घेऊन १:२ या प्रमाणात मुलाखती घेण्यात येतील.

११) उमेदवारांच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राचीच साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

१२) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (true copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१३) निवड झालेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात करारनामा करून दिल्यानंतर कंत्राटी पद्धतीने नेमणूक दिली जाईल.

१४) येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. कोणताही प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, नाष्टा, भोजन, राहण्याची व्यवस्था इत्यादी व्यवस्था राहणार नसून त्या आपण स्वतः करावयाच्या आहेत.

१५) वरील पदे ही संपूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची असल्याने या पदावर कायम स्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१६) प्रारूप गुणवत्ता यादी (पॅनल)मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना तात्काळ रुजू होणे आवश्यक राहील.

१७) वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार विभागप्रमुखांना राहतील.

१८) अपात्र ठरवलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९) बोलावलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२०) पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. कोणतेही पूर्वकारण/सूचना न देता केव्हाही मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर हे स्वतःकडे राखून ठेवतील. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२१) महापालिकेच्या आस्थापनेवरील नियमित कर्मचाऱ्यांच्या लाभदायी योजनांचा कंत्राटी कर्मचाऱ्यांना लाभ होणार नाही. तथापि, शासनाच्या कोव्हिड-१९ अंतर्गत आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे दिनांक ०८.०४.२०२० च्या तरतुदीनुसार ५० लक्ष विमा योजनेचा लाभ कंत्राटी कर्मचाऱ्यांनादेखील शासन अटीनुसार लागू असेल.

२२) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२३) काम सोडण्यासाठी एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. विहित कालावधीत राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

२४) नियमित पदांची भरती झाल्यास कंत्राटी पद्धतीच्या पदांची भरती रद्द करण्यात येईल.

सही/-
(डॉ. राजा दयानिधी भा. प्र. से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र.उमपा/पीआरओ/२६३/२०२१
दि.:- ०४.०६.२०२१